# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१. फॅक्सः ९१-२२-२६५९०४५७
दूरध्वनीः ०२२-२६५९०५१९/०४०५/१८७९/०९९३
Email : info@sra.gov.in


**परिपत्रक क्र.९६**

क्र.झोपुप्रा/ विनि/ परिशिष्ट ३/ २००९/ ३९९.
दि. १३.४.२००९.

**वाचा :** परिपत्रक ८७ क्र.झोपुप्रा/ विनि/ परिशिष्ट ३/२००८/९३६, दि.२३.६.२००८

## परिपत्रक

वरील निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकात अंशत फेरफार करुन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत परिशिष्ट-३ व्दारे विकासकाची आर्थिक क्षमता तपासण्यासाठी यापूर्वी पुनर्वसन सदनिका बांधण्याचा अंदाजित खर्च प्रति सदनिका रु.३,३०,०००/- असा धरण्यात येत होता. जागतिक आर्थिक मंदीमुळे बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याच्या किंमतीत झालेली घट लक्षात घेता अभियांत्रिकी विभागाने सुचविल्याप्रमाणे यापुढे संपूर्ण बृहन्मुंबई क्षेत्रासाठी प्रति पुनर्वसन सदनिका बांधकाम खर्चाची रक्कम रु.३,३०,०००/- ऐवजी रु.२,६४,०००/- अशी धरण्यात यावी. हे सुधारित आदेश ज्या प्रकल्पास अदयापी आशयपत्र निर्गमित करण्यात आलेले नाहीत त्यास लागू होतील.

वित्त नियंत्रक यांनी यापुढे परिशिष्ट -३ निर्गमित करतांना ही बाब लक्षात घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रत,

१. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक
२. विशेष कार्य अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक
३. सचिव यांचे स्वीय सहाय्यक
४. वित्त नियंत्रक यांचे स्वीय सहाय्यक
५. उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा
६. विधी सल्लागार, झोपुप्रा
७. उप मुख्य अभियंता, झोपुप्रा
८. कार्यकारी अभियंता, झोपुप्रा
९. अभियांत्रिकी शाखा, झोपुप्रा
१०. सहाय्यक संचालक नगर रचना, झोपुप्रा
११ सहाय्यक निबंधक, झोपुप्रा
१२ विशेष भूसंपादन अधिकारी, धापुप्र
१३ उप मुख्य अभियंता समन्वयक, धापुप्र
१४ समाज विकास अधिकारी, धापुप्र
१५ प्रशासन निवडनस्ती/ [redacted].